# बृहन्मुंबई महानगरपालिका

माहितीचा अधिकार अधिनियम कलम (4) (1) (बी) (i) विभाग 2

वर्ष 2020– 2021

**नियमावली क्र.1**

प्रस्तावना

## मुंबई मलनि:सारण प्रकल्प

## खात्याची संक्षिप्त ओळख -

मुंबईतील मलनि:सारण प्रणाली १३० वर्षापेक्षा जास्त जुनी आहे. या मलनि:सारण प्रणालीमध्ये १८३० किमी मलनि:सारण वाहिन्यांचे जाळे असून त्यामध्ये ६५४१२ मनुष्य प्रवेशिका ५१ उदंचन केंद्रे मिळून प्रतिदिनी ५६०० दशलक्ष लिटर एकूण क्षमता आहे आणि ७ प्रकिया केंद्रे समाविष्ट आहेत याद्वारे प्रतिदिनी १७०० दशलक्ष लिटर मलजल गोळा केले जाते.

गोळा केलेले मलजल कुलाबा, वरळी व वांद्रे येथील सागरी पातमुखाद्वारे तसेच वर्सोवा, घाटकोपर व भांडूप येथील वातित तलावांमार्फत खाडीमध्ये सोडले जाते. मालाड येथे गोळा होणा-या मलजलावर पूर्व प्राथमिक प्रक्रीया केल्यानंतर मालाड येथील खाडीमध्ये सोडले जाते.

मुंबई महानगर पालिकेने हाती घेतलेला मुंबई मलनि:सारण प्रकल्प बृहत आराखडयाप्रमाणे तसेच निरीक्षण व नियंत्रण प्राधिका-यांनी वेळोवेळी बहिर्गामी विसर्ग मानकांसाठी दिलेल्या मार्गदर्शन तत्वांनुसार सन २०२५ पर्यत पूर्ण करण्याचे प्रस्ताविले आहे. या अंतर्गत मुंबई मलनि:सारण प्रकल्प खात्यातर्फे बांधकाम करण्याचे प्रस्ताविलेल्या ७ मलजल प्रक्रिया केंद्रामधे या मलजलावर तृतीय स्तरावरील प्रक्रिया करणे समाविष्ट असून प्रक्रिया केलेले मलजलावर पुर्नप्रक्रिया करुन पिण्याच्या पाण्याव्यतिरीक्त / औद्योगीक कारणासाठी पुनर्वापर करणे शक्य होईल. प्रस्तावित ७ मल जल प्रक्रिया केंद्राचा संक्षीप्त तपशील खालील प्रमाणे आहे.

कुलाबा मल जल प्रक्रिया केंद्राचे काम पूर्ण झाले असून ते मलनि:सारण प्रचालन खात्यास दि.४.९.२०२० रोजी हस्तांतरित करण्यात आले आहे.

भांडुप (२१५ एमएलडी) आणि घाटकोपर (३३८ एमएलडी) क्षमतेच्या मलजल प्रक्रिया केंद्राच्या बांधकामासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत व लिफाफा 'क' ची कार्यवाही सुरु आहे.

वरळी व वांद्रे मलजल प्रक्रिया केंद्रासाठी जागेची कमतरता आहे. यास्तव वरळी (लव्हग्रोव्ह) येथील उपलब्ध जागेत ५०० एमएलडी क्षमतेचे मल जल प्रक्रिया केंद्र उभारण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत व लिफाफा 'क' ची कार्यवाही सुरु आहे.

वरळी (लव्हग्रोव्ह) च्या धर्तीवर वांद्रे परिमंडळासाठी ३६० एमएलडी क्षमतेचे मल जल प्रक्रिया केंद्र वांद्रे रेक्लमेशन व धारावी येथे ४१८ दशलक्ष लिटर प्रति दिन क्षमतेचा मलजल प्रवाह सुरळीतपणे करण्याकरिता विभागला आहे. वांद्रे व धारावी येथे मलजल प्रक्रिया केंद्र उभारण्याकरिता निविदा मागविण्यात आल्या आहेत व लिफाफा 'क' ची कार्यवाही सुरु आहे.

धारावी पंपींग स्टेशन येथील संपूर्ण जागेवर 418 दशलक्ष लिटर प्रतिदिन या क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र उभारणीसाठी निविदा मागविण्यात आल्या असून लिफाफा 'क' उघडण्यात आले आहे. सदर लिफाफा 'क' ची पडताळणी प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

वर्सोवा मलजल प्रक्रिया केंद्र (180 एमएलडी) उभारण्याकरिता निविदा मागविण्यात आल्या आहेत व लिफाफा 'क' ची कार्यवाही सुरु आहे.

बृहत आराखडयाप्रमाणे मालाड परिमंडळासाठी ४५४ एमएलडी क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र प्रस्तावित आहे. मल जल गोळा करण्याच्या व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी डॉन बॉस्को बोरीवली पासून मालाड मलजल प्रक्रिया केंद्रापर्यंत व गोरेगांव उदंचन केंद्रापासून मालाड मलजल प्रक्रिया केंद्रापर्यंत २ बोगदे प्रस्ताविले आहेत. मालाड मलजल प्रक्रिया केंद्र उभारण्याकरिता निविदा तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे. दरम्यानच्या काळात 35 हेक्टर जमीन भरपाई वनीकरणाकरिता वन विभागाकडे सोपविली आहे. वने व पर्यावरण मंत्रालयाकडे मान्यता मिळण्याकडे प्रयत्न सुरु आहेत.

मुंबईतील ७ मलनि:सारण परीमंडळातील उपरोक्त प्रमुख कामांव्यतिरीक्त वल्लभ नगर मलनि:सारण उदंचन केंद्र आणि चिंचपोकळी उदंचन केंद्रांची कामे दि.१.१.२०१७ पासून सुरु झाले व दि.१३.७.२०२० रोजी पूर्ण झाले आहे. तसेच एस. व्ही. रोड वर जय भारत पंपिंग स्टेशन ते बांद्रा अंतर्गमी उदंचन केंद्रापर्यंत मलजल बोगदा बांधण्याचे काम सन 2019 पासून सुरु झाले असून प्रगतीपथावर आहे.

सर्वंकष मलनि:सारण प्रक्रिया सुविधेचे लक्ष गाठण्यासाठी व हे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी भविष्यात होणारा विलंब टाळण्यासाठी आणि मल जल प्रक्रियेमध्ये टप्प्याटप्प्याने सुधारणा करण्याच्या दृष्टीकोनात थोडा बदल करुन सर्व टप्पे एकत्र केले जातील. मुंबई मलनि:सारण प्रकल्पांतर्गत प्रस्तावित केलेली कामे सातत्याने पूर्ण करण्यासाठी पाऊले उचलण्यात आलेली आहेत ज्यायोगे मुंबईचे पर्यावरण आणि अरबी समुद्राच्या पाण्याच्या दर्जात सुधारणा होणे हा मैलाचा दगड ठरेल.

**सही/-**

**प्रमुख अभियंता (मुंमप्र)**